दैनिक
राष्ट्र सह्याद्री
E-pepar - 10 Sep 2025 - Page 2

वडाळा महादेव येथे सायबर सुरक्षा उपक्रमाची सुरुवात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी व क्रिक हील फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमाची सुरुवात तालुक्यातील वडाळा महादेव येथील छत्रपती शिवाजी विद्यालय येथे करण्यात आली करण्यात आली.

२ ऑगस्ट २०२५ पासून सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी वैष्णवी कांबळे, सायली मदाने, गणेश गुंठाळ, गिरीश चव्हाण व किरण जाधव यांनी विविध शाळांमध्ये व ग्रामपंचायतींमध्ये जाऊन फिशिंग, ऑनलाईन फसवणूक, सुरक्षित पासवर्ड व इंटरनेटचा जबाबदार वापर यावर सत्रे घेतली. यामध्ये विशेषतः छत्रपती शिवाजी विद्यालयात शालेय विद्यार्थ्यांसाठी माहितीपर सत्र घेण्यात आले असून, प्राचार्य माळी यांनी या उपक्रमासाठी मौल्यवान वेळ दिला. तसेच ग्रामपंचायत कार्यालययेथे प्रभावी कार्यशाळा घेण्यात आली असून, सरपंच सचिन पवार यांच्या उपस्थितीमुळे या उपक्रमाला विशेष बळ मिळाले. या मोहिमेला विद्यार्थ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, सायबर सुरक्षिततेचे धडे आपल्या दैनंदिन डिजिटल वापरात उतरविण्याची प्रेरणा ते घेत आहेत.